| | | | |
|---|---|---|---|
| **MHKO190002252024** | दाखल दिनांक | :- | १०/०४/२०२४ |
| | नोंदणी दिनांक | :- | १०/०४/२०२४ |
| | निकाल दिनांक | :- | २७/०७/२०२६ |
| | कालावधी | :- | वर्ष महिने दिवस |
| | | | ०२ ०३ १७ |

| | | |
|---|---|---|
| **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, राधानगरी, जि.कोल्हापूर यांचे न्यायालयात**<br>(पीठासीन अधिकारी एन. पी. काकडे)<br>न्यायनिर्णय घोषित दिनांक – २७ जुलै,२०२६<br>**(नियमित फौजदारी खटला क्र. ३९/२०२४) (नि.क्र.१९)** | | |
| गुन्हा नोंद क्र.३०९/२०२३, पोलीस ठाणे राधानगरी, जि.कोल्हापूर | | |
| अभियोगपक्ष | | **महाराष्ट्र शासन,**<br>पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, राधानगरी |
| अभियोग पक्षातर्फे | | सहा.सरकारी अभियोक्ता श्री. एस. बी. कांबळे |
| आरोपी | | **१. प्रदीप अरूण सकट**<br>वय – २८ वर्षे,<br>राहणार- सुदर्शननगर, गारगोटी,<br>ता-भुदरगड, जि-कोल्हापूर.<br><br>**२. प्रशांत शामराव कांबळे**<br>**(मयत)** |
| आरोपींतर्फे विधीज्ञ वकील | | ॲड. श्री. ए. एस. हुपरीकर |

**भाग-ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | १९/११/२०२३ |
| फिर्याद दाखल दिनांक | :- | १९/११/२०२३ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :- | १०/०४/२०२४ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | १५/१२/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | १६/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | २७/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | २७/०७/२०२६ |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | निरंक. आरोपींना निर्दोषमुक्त करण्यात येते. |

**आरोपींची माहिती**

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रदीप अरूण सकट | - | - | भा.दं.वि.सं. कलम ३५४(ब), ५०९,४५२, ३२३,३४ अन्वये. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| २. | प्रशांत शामराव कांबळे **(मयत)** | - | - | -II- | -II- | -II- | -II- |

**न्या य नि र्ण य**

**(घोषित दिनांक २७/०७/२०२६)**

भारतीय दंड विधान,१८६० चे कलम ३५४(ब), ५०९, ४५२, ३२३ सह कलम ३४ अंतर्गत आरोपींवर संपरीक्षा चालविण्यात येत आहे. (यापुढे सोईकरीता भा.दं.वि. संबोधण्यात येईल.) आरोपी क्र.२ मयत झालेने दि.०२/०७/२०२६ रोजी त्याचे विरूध्द नि.१ खाली आदेश पारीत करून संपरीक्षा संपविणेत आली.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे:-**

**२.** दिनांक १९.११.२०२३ रोजी दुपारी ३:०० ते दुपारी ३:३० वाजताचे सुमारास फिर्यादी सौ. तेजल योगेंद्र राणे यांचे पती योगेंद्र ज्ञानदेव राणे यांना यातील आरोपी

प्रशांत व आरोपी प्रदीप यांनी राहते घराबाहेर बोलावुन घेवुन जावुन त्यांना मारहाण करून फिर्यादी यांचे राहते घरी येवुन फिर्यादीकडे त्यांनी घेतलेले पैसे मागितले असता फिर्यादीने त्यांना सध्या आमच्याकडे तुम्हाला द्यायला पैसे नाहीत, पैसे आल्यानंतर देतो असे सांगत असताना यातील आरोपी प्रदीप याने फिर्यादीला तुझ्याकडे पैसे नसतील तर पैश्यांच्या बदली तु चल असे बोलुन फिर्यादीचा उजवा हात धरून तिने परिधान केलेला टॉप फाडुन फिर्यादीचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केलेने फिर्यादीने सदर घटनेबाबत राधानगरी पोलीस ठाण्यात प्रथम खबर दाखल केली.

**३.** सदर प्रथम खबरी अहवालावरुन पोलीस ठाणे राधानगरी येथे आरोपीं विरूद्ध गुन्हा क्र.३०९/२०२३ भा.दं.वि. चे कलम ३५४(ब), ५०९, ४५२, ३२३ सह कलम ३४ प्रमाणे नोंदविला. तपासी अंमलदार यांनी घटनेचा तपास केला व तपास पुर्ण करुन न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

**४.** आरोपीं विरूध्द भा.दं.वि.चे कलम ३५४(ब), ५०९, ४५२, ३२३ सह कलम ३४ अन्वये नि.क्र.११ कडे दोषारोप निश्चित केला व आरोपींना त्यांचे विरुद्ध असलेल्या गुन्हयाचा तपशिल समजावून सांगितला. आरोपीने त्याचे निवेदन नोंदवुन गुन्हा कबुल नसल्याचे कथन केले व खटला चालविण्याची मागणी केली.

**५.** अभियोग पक्षाने आरोपींविरुद्धचा गुन्हा शाबित करण्यासाठी एकुण २ साक्षीदार तपासले आहेत. अभियोग पक्षाने नि.क्र. १८ खाली पुरसीस दाखल करुन त्यांचा पुरावा बंद केला. आरोपी विरुद्ध पुराव्यात कोणत्याही बाबी न आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे चे निवेदन नि.क्र.१ वर आदेश करुन माफ करण्यात आले.

**६.** अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. बी. कांबळे व आरोपींचे वकिल ॲड. श्री. ए. एस. हुपरीकर यांचा युक्तीवाद ऐकला.

**७.** प्रस्तुत प्रकरणात खाली नमुद विचाराधीन प्रश्न माझे विचारासाठी पुढे आलेले आहेत. त्यावरील माझे निष्कर्ष मी खाली नमुद कारणमिमांसेसह देत आहे.

| अ.क्र. | विचाराधीन प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपींनी संगनमताने फिर्यादीवर विवस्त्र करण्याच्या उद्देशाने फौजदारी बळाचा वापर केला व त्याअन्वये भारतीय दंड विधानाचे कलम ३५४(ब) सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| २. | आरोपींनी संगनमताने फिर्यादीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने शब्दोच्चार, हावभाव व कृती केली व त्याअन्वये भारतीय दंड विधानाचे कलम ५०९ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| ३. | आरोपींनी संगनमताने फिर्यादी यांना दुखापत करण्याच्या पुर्वतयारीने गृह अतिक्रमण केले व त्याअन्वये भारतीय दंड विधानाचे कलम ४५२ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| ४. | आरोपींनी संगनमताने फिर्यादीचे पतीस लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन दुखापत पोहचविली व त्यान्वये भारतीय दंड विधान विधानाचे कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| ५. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>विचाराधीन प्रश्न क्र.१ ते ४ बाबत</u>**:-

८. विचाराधीन प्रश्न क्र. १ ते ४ एकमेकांशी सुसंगत असल्याने त्यांची कारणमिमांसा एकत्रितरित्या नोंदवित आहे.

९. प्रथम खबर देणार तेजल (अ.सा.क्र.१) यांनी त्यांचे पुरावेत कथन केले आहे की, आरोपी हे त्यांचे पतीचे मित्र होय. दि.१९/११/२०२३ रोजी काहीही घडले नसल्याचे त्यांनी कथन केले. साक्षीदार सहकार्य करत नसल्याने अभियोग पक्षाने न्यायालयाच्या परवाणगीने साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरूपातील प्रश्न विचारले. परंतु साक्षीदाराने अभियोग पक्षाची सर्व कथने नाकारली आहेत.

१०. साक्षीदार योगेंद्र (अ.सा.क्र.२) यांनी त्यांचे पुरावेत कथन केले की, आरोपी हे

त्यांचे मित्र असुन त्यातील आरोपी क्र.२ हा मयत झाला आहे. आरोपी क्र.१ हे त्यांचे वर्गमित्र आणि आरोपी क्र.२ हे त्यांचे गावातील असल्याचे त्यांनी कथन केले. दि.१९/११/२०२३ रोजी काहीही घडलेले नसल्याची त्यांनी सांगितले. अभियोग पक्षाने न्यायालयाच्या परवाणगीने साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरूपातील प्रश्न विचारले. परंतु अ.सा.क्र.२ ने देखील अभियोग पक्षाची सर्व कथने नाकारली आहेत.

**११.** साक्षीदारांचे पुरावे वाचता साक्षीदारांनी अभियोग पक्षास कोणतेही सहाय्य केले नाही. सदर साक्षीदारांनी आरोपींविरुद्धचा गुन्हा शाबीत होईल असा कोणताही पुरावा या प्रकरणात दिलेला नाही. अभियोग पक्ष प्रथम खबर अहवाल सिध्द करण्यास अपयशी ठरला आहे. सबब, मी **विचाराधीन प्रश्न क्र.१ ते ४** चे उत्तर **नकारार्थी** नोंदवित आहे.

**विचाराधीन प्रश्न क्र.५ बाबत:-**

**१२.** वर नमुद सर्व चर्चा व विचाराधीन प्रश्न क्र. १ ते ४ चे निष्कर्ष विचारात घेता, आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, प्रश्न क्र.५ च्या उत्तरासाठी खालील आदेश पारीत करण्यात येतो :

**- आ दे श -**

**१.** आरोपी क्र.१ **प्रदीप अरूण सकट** यास फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) प्रमाणे भारतीय दंडविधान, १८६० चे कलम ३५४(ब), ५०९, ४५२, ३२३ सह कलम ३४ नुसार शिक्षापात्र गुन्हा केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

**२.** आरोपीचे वैयक्तीक जात मुचलके व जामीनकदबे रद्द करण्यात येत आहेत.

**३.** आरोपी क्र.१ ला असे निर्देश देण्यात येतात की, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७-अ ची पुर्तता करण्यासाठी त्यांनी रु.१५,०००/- चे बंधपत्र व जामीनपत्र सादर करावे.

**४.** आरोपी क्र.२ मयत असल्याने दि.०२/०७/२०२६ चे आदेशाने त्याचे विरूध्द खटला संपविण्यात आला आहे.

***(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)***

Sd/-

ठिकाण : राधानगरी **(एन. पी. काकडे)**

दिनांक : २७/०७/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

(न्यायालय क्र.२) राधानगरी.

## भाग-क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

### सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार

**१) अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी-**

**अ. अभियोग पक्ष साक्षीदारांची यादी**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १. | तेजल योगेंद्र राणे | फिर्यादी | १५ |
| २. | योगेंद्र ज्ञानदेव राणे | जखमी साक्षीदार | १७ |

**ब. बचाव पक्ष साक्षीदारांची यादी- निरंक**

**क. न्यायालयीन साक्षीदारांची यादी- निरंक**

**२) अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/ न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)-**

**अ. अभियोग पक्ष निशाणी -**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १६ | फिर्यादी जबाबावरील फिर्यादीच्या सहीस |
| २. | १८ | अभियोग पक्षातर्फे पुरावा संपलेची पुरसीस |

**ब. बचाव पक्ष निशाणी- निरंक**

**क. न्यायालयातर्फे निशाणी-**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |

**ड. सामग्री वस्तू- निरंक**